ISSN - 2278-9308

# 'बिराड' मधील स्त्रीजीवन

प्रा.डॉ. सविता मा. पवार
कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर, जि.बुलडाणा

प्रस्तावना :-

'बिराड' हे अशोक पवार यांचे अस्वस्थ करणारे आत्मकथन. ह्या आत्मकथनातील माणसांचे जगणे मन सुन्न करणारे आहे. बेलदार समाजाचे पशुतुल्य जगणे या आत्मकथनातून व्यक्त होत राहते. गावाच्या बाहेर, गोदरीत पाल ठोकून वास्तव्य करणारी ही जमात. चिरे फोडायचे, भिंती रचायचे काम हा समाज करतो. एका गावातील काम संपले की दुसऱ्या गावी जाऊन काम शोधायचे, कामाच्या शोधात गावोगाव बिराड टाकून सारखी भटकंती या बेलदारांची चालू असते. अशा बेलदार समाजात जन्माला आलेल्या अशोक पवार यांच्या बालपणापासून ते दहावी उत्तीर्ण होईपर्यंतचा प्रवास प्रस्तुत आत्मकथनात येतो. प्रस्थापित समाजाकडून, पोलिसांकडून या समाजावर पिढ्यानपिढ्या अन्याय, अत्याचार होत आलेला आहे. अठराविश्वे पाठिशी असलेले दारिद्र्य, अनेक प्रकारची संकटे, अपमान, अवहेलना, अंधश्रध्दा यांचे दाहक दर्शन हे आत्मकथन घडवते. स्त्रियांच्या वाट्यालाही ही परिस्थिती येते. गावातील लोकांकडून, पोलिसांकडून त्यांचे शारीरिक शोषण होते, स्त्रियांच्या संघर्षमय जीवनाचे दर्शन बिराडव्दारे घडते. बिराड मध्ये अनेक स्त्री व्यक्तिरेखा आहेत. काही व्यक्तिरेखा या समाजातील आहे तर काही या समाजाबाहेरच्या आहेत. प्रस्तुत आत्मकथनामध्ये स्त्रियांचा अमानुष छळ झालेला दिसतो. जातपंचायती देखील स्त्रियांचा छळ करतात. गावगुंडांनी विवस्त्र केलेली बुढी आजी, धोंड्याची विधवा बायको सरीमामीला मदत करणारा पाटील तिला गरोदर करतो, त्यातच पुढे जातपंचायतीच्या क्रूर निवाड्यामुळे तिचा करुण अंत होतो. ईस्माईल हा अशोकच्या पहिल्या पत्नीवर जबरदस्ती करताना दिसतो. अशोकची आई, पारीमामी, अशोकची बहिण सोजी, भोयाची दारु विकणारी तरुण मुलगी शांती, खेम्या बेलदाराची बायको रुक्मी, जटाळ्या भगताची मुलगी काशी, बायको मंदोदरी, उकंडा बेलदाराची बायको गऊ ह्या स्त्रिया अन्याय, अत्याचाराला बळी पडल्या आहेत. व्यवस्था वेगवेगळ्या मार्गाने स्त्रियांचा छळ करताना दिसते. कोणत्याही संवेदनशील मनाला अस्वस्थ करणारे असे स्त्रिजीवनाचे दर्शन 'बिराड' या आत्मकथनामध्ये घडते.

बेलदार समाजामध्ये स्त्रियांना मिळणारी वागणूक :

'बिराड' या आत्मकथनामध्ये बेलदार समाजातील स्त्री ही अन्याय अत्याचाराखाली पिचून गेलेली दिसते. प्रस्थापित समाजाकडून जसा तिच्यावर अत्याचार होतो त्याचप्रमाणे स्वतःच्या समाजाकडूनही होताना दिसतो. दारू पिऊन पुतळाचा नवरा तिला लाथाबुक्क्यांनी मारतो. नवऱ्याचा व्यसनीपणा आणि मारहाण सोसून ही स्त्री त्याचा संसार नेटाने सांभाळते. नवऱ्याच्या वागण्याला कंटाळलेली पुतळा म्हणते, 'मड गेलं त्या आयी बाचं पिदाड्या नवरा करुण देला. मव्ह समदं वाटोळ केलं. लेक मेली का जिती हाय त्येबी पाहयालं आले न्हाय. आता ह्यांच्यासंग मव्हा जल्म कटत न्हाय. म्या हिरच भरते'पुतळा अशी वैतागून जाते पण नवऱ्याची ती काळजीही घेते. आपली बायको सुंदर दिसू नये, त्यासाठी तिने रोज आंघोळ करु नये, केस विंचरु नये असे निर्बंध पुरुषवर्गाकडून लादले जातात. गावातील गावगुंडाची नजर आपल्या स्त्रीवर पडू नये याची भीती बेलदार समाजातील पुरुषाला वाटते. त्यासाठी तो तिला एकटीला कोठे जाऊ देत नाही. 'गोरी बायको लोकायसाठी आन् काळी बायको सोतासाठी' अशा शब्दात अशोकचे वडील त्याला समजावून सांगतात. समाजाच्या वाईट नजरांपासून आपल्या कुटुंबातील स्त्रीचे संरक्षण करण्यासाठी बेलदार समाजातील पुरुष स्त्रियांना मारहाण करतो. बायकोला मारहाण करण्याचा अधिकारच आपल्याला मिळाला आहे, अशा वृत्तीने पशुतुल्य मारहाण स्त्रियांना होताना दिसते. 'ही मही बायकू हाय. ईला म्या मारून टाकील. तुमाला काय घेनं देनं.' अशा वृत्तीने वावरणारा पुरुष 'बिराड' मध्ये दिसतो.

आईवडीलांनी वा जातपंचायतीने ज्या पुरुषाशी लग्न लावून दिले त्याचा संसार वाटेल ते भोग भोगून सांभाळणारी ही स्त्री आहे. कान्हू सतीमातेची कथा त्यादृष्टीने महत्वाची आहे. कुष्ठरोग्याशी लग्न लावूनसमाजफसवणूक करतो आणि कान्हू श्रध्देने नवऱ्याची सेवा करताना दिसते. भटकेपणामुळे आपल्या माणसांची ताटातूट होण्याचे प्रसंग या स्त्रियांवर येत राहतात. हरणीचे लग्न



330

ISSN - 2278-9308

होऊन चौदा वर्षे झाली पण या कालावधीत तिची आणि माहेरच्या माणसांची भेट झालेली नाही. पवारांची आई पुतळा आपल्या वडिलांच्या शेवटच्या आजारपणात त्यांना भेटू शकत नाही. बंडूमामा वेडा होतो. वडीलांचा मृत्यू होतो. या साऱ्या वेदना सोसत तिला रोजच्या जीवनाशी सामना करावा लागतो. काबाडकष्ट करून, अंगमेहनतीची कामे करून, प्रसंगी भीक मागून ही स्त्री आपल्या संसाराला हातभार लावते. गावाबाहेर पालावर भटके जीवन जगणारी बेलदार समाजाची स्त्री उघड्यावर डॉक्टर, वैद्य, सुईणीच्या मदतीशिवाय बाळंत होते. आपल्या मुलांचे अपघाती मृत्यू या स्त्रियांना वेदना देऊन जातात. पवारांची बहीण सोजी अंगावर गरम चहा पडल्याने भाजते. वैद्यकिय उपचाराच्या अभावी तिचा मृत्यू होतो. अंगारेधुपारे यात हा समाज अडकून पडलेला आहे. सरीमामीचा पोरगा वाघाची शिकार बनतो. पारीमामीचे बाळ पाण्यात वाहून जाते अशा दुःखाला सामोरे जाताना या स्त्रियांना किती प्राणांतिक वेदना होत असतील याची कल्पनाच न केलेली बरी. सर्वदृष्टीने असुरक्षित जीवन या स्त्रियांच्या वाट्याला आलेले दिसते. बुढी म्हणजे पवारांची आजी आपल्या मुलाला धाबरून असते. त्यामुळे गावगुंडांनी दिलेला त्रास ती लक्ष्मणला सांगत नाही. बुढीचा – रूक्मिणीचा मृत्यू चटका लावून जातो. गावपंगतीमध्ये असलेले बुंदीचे जेवण आपल्यालाही मिळावे म्हणून आपल्या कुटुंबासोबत गेलेली बुढी – जेवण तर मिळत नाही पण अंगावर विज पडून मरते. तिचे कलेवरही पाण्यात वाहून जाते. दुःखभोग सोसत आयुष्य काढताना जीवनाचाझालेला शेवट कुणाच्याही ह्दयाला हेलावून टाकणारा आहे.

बेलदार समाज स्त्रीकडे माणूस म्हणून न पाहता एक वस्तू या दृष्टीने तिला वागवतो. आपला हेतू साध्य करण्यासाठी या समाजातील पुरुष स्त्रीचा खेळण्यासारखा उपयोग करतो. सोयरिकीसाठी आपल्याला बोलावले नाही म्हणून जातपंचायतीचा पुढारी सिरंग सलार स्त्रीचे हत्यार बनवून स्वतःची दहशत निर्माण करतो. या समाजावर अज्ञान, अंधश्रध्दा, भुताटकी आदी गोष्टींचा प्रभाव आहे. उकंडा बेलदाराची बायको गऊ हिच्या अंगातील भूत काढण्याच्या मिषाने जटाळ्या भगत गऊवर अतिप्रसंग करतो. त्याचा बदला म्हणून उकंडा हा जटाळ्या भगताची बायको मंडोदरी हिच्यावर अत्याचार करतो. या प्रसंगात अन्याय होतो तो स्त्रीवर. मंडोदरी गयावया करते. आपल्यावर अत्याचार होऊ नये म्हणून विनवण्या करते. पण कोणावरही त्याचा परिणाम होत नाही. जटाळ्या भगताने केलेल्या गुन्ह्याची शिक्षा मंडोदरीला भोगावी लागते. शोषणाला बळी पडलेली ही स्त्री तशाही मनःस्थितीत आपल्या पतीला सोडण्यासाठी विनवण्या करते. मुरळी सोडण्याची प्रथा बेलदार समाजात दिसते. मुलबाळ व्हावे म्हणून पहिले अपत्य देवीला सोडण्याचा नवस बुगाजी करतो. त्यामध्ये त्याची मुलगी गया हिचा बळी जातो. गयाला बुगाजी मुरळी म्हणून सोडतो. स्त्रियांचे जीवन रूढीपरंपरा, अंधश्रध्दा, जातपंचायत, पुरुषी समाजव्यवस्था यामध्ये जखडून गेलेले दिसते.

प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या अन्याय – अत्याचाराच्या बळी :

गावाच्या बाहेर उघड्यावर पालावरचे जगणे बेलदार समाजाला जगावे लागते. पोटापाण्यासाठी गावात चिरे फोडायचे, विहिरी बांधायचे काम हा समाज करतो. गावचे पाटील, सरपंच, गावगुंड, पोलीस यांच्या अत्याचाराला या स्त्रिया बळी पडलेल्या दिसतात. बुढी गावात भीक मागायला जाते तेव्हा गावकरी हरकत घेतात. तिला बोलतात. अंगावर कुत्रा सोडतात. पाठलाग करून मारहाण करतात. एवढेच नाही तर तिला विवस्त्र करतात. पालावर राहणाऱ्या या स्त्रियांचा कोणी वाली नाही. नियती, परिस्थिती, समाज आणि व्यवस्थेच्या शोषणाच्या या स्त्रिया बळी ठरल्या आहेत. आमच्या माणसांना मारू नका म्हणून पोलिसांकडे विनवण्या करणाऱ्या सरीमामीची छेडछाड होते. अश्लिल बोलणी ऐकावी लागतात. बुढीला विवस्त्र केले जाते. गावात भीक मागायला गेलेल्या स्त्रियांना गाववाले चिडवतात, खिल्ली उडवतात. 'पावणे आले ठेवा मुक्कामाला' म्हणून हसतात. प्रसंगी शिव्याशाप ऐकावे लागतात. वाईट प्रवृत्तीचे लोक या स्त्रियांच्या परिस्थितीचा गैरफायदा घेतात. विधवा सरीमामीला गावचा पाटील मेहरबान होऊन मदत करतो. भावाचे नाते लावून तिचे शोषण करतो. अशा पुरुषाला कोणतीही शिक्षा नाही पण सरीमामीला मात्र शिक्षा भोगावी लागते. पारीमामीलाही आपला जीव गमवावा लागतो. उजवा हात लुळा पडलेल्या बंडूमामाकडून कोणतेही काम होत नाही. अशावेळी हातभट्टीची दारू विकणारी पारीमामी वाहवत जाते. गावचा देशमुख तिला रखेली बनवतो आणि एके दिवशी तिला दिवसाढवळ्या पेटवून जाळून मारतो. त्याचे कोणीही काही बिघडवू शकत नाही. पारीमामी मात्र जीवाने जाते आणि तिचे घर उदध्वस्त होते. परिस्थितीपुढे



Scanned with CamScanner

लाचार झालेल्या आणि वाहवत गेलेल्या स्त्रिया बिराड मध्ये भेटतात. सरीमामी प्रमाणेच पारीमामीचाही हकनाक बळी गेला आहे. मदतीचा हात पुढे करत इस्माईल पवारांची पत्नी यशोदा हिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न करतो पण यशोदा त्याच्या कचाट्यातून निसटते. परिस्थितीने हतबल झालेल्या, दारिद्र्याने गांजलेल्या आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून लांब असलेल्या या स्त्रियांचे संधीसाधू शोषण करताना दिसतात. न्याय मागायला त्या कोठे जाऊ शकत नाहीत. ज्यांच्याकडे तक्रार करावी, ज्यांनी संरक्षण करावे, त्या पोलिसांविषयी या समाजामध्ये दहशत आहे. पोलिसांकडूनही या समाजावर अन्याय, अत्याचार झालेले आहेत. चोर समजून त्यांच्यावर हकनाक गुन्हे लादल्या गेले आहेत. बेदम पशुतुल्य मारहाण पोलिसांकडून तसेच गावकऱ्यांकडूनही त्यांना केली जाते. अशावेळी मध्ये पडणाऱ्या बेलदार स्त्रियांनाही मारहाण करण्यात कसूर केली जात नाही. चोरीचा खोटा आळ घातलेल्या धोंड्यामामाचा पोलिसांकडून झालेल्या मारहाणीत बळी जातो. सरीमामीला ही व्यवस्था विधवा करते. दाद कोठेही मागता येत नाही. स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होऊन सुभाषबाबूंच्या सैन्यात काम केलेल्या नानाला आपल्या मुलाचा असा मृत्यू पहावा लागतो. परिस्थितीमुळे धोंड्यामामाला दवाखान्याच्या पाठीमागे दफन करून घरचा रस्ता धरावा लागतो.

अपमान, अवहेलना आणि शोषण या स्त्रियांच्या वाट्याला आलेले आहे. 'बिराड'मध्ये स्त्री ही कुठल्या ना कुठल्या अन्यायाला बळी पडलेली आहे. यंकातात्याच्या बायकोला पोलिस ठाण्यावर नेतात आणि तेथेच ठेवतात. चोरीचा आरोप असलेला यंकातात्या सापडत नाही म्हणून त्याच्या बायकोला ठाण्यावर ठेवले जाते. हा या व्यवस्थेचा कोणता न्याय म्हणावा? तेथे तिचे शोषण होते. तिच्यावर अत्याचार होत राहतात. पोलिस ठाण्यामध्ये असे प्रकार घडतात आणि या अत्याचारातून ती गरोदर राहते. दिवस भरत आल्यानंतर तिची तेथून सुटका होते. एकप्रकारे अत्याचार करणारे पोलीस स्वतःचीच सुटका करून घेतात. गरोदर असलेली काकी तिचे पुढे काय? असा प्रश्न त्यांना पडत नाही. एक उपभोग्य वस्तू यापलीकडे समाज या स्त्रीकडे पाहत नाही. जातीमध्ये इज्जत जायला नको, बेअब्रु व्हायला नको म्हणून जिवंत बाळाला पुरून टाकले जाते. याला जबाबदार आहे शोषण करणारीही व्यवस्था. भोयाची शांती दारू विकून कुटुंब पोसते. पैशाच्या जोरावर शेषराव पाटलाने तिला रखेल म्हणून ठेवली आहे. तिला तो शेत देणार आहे, बंगला देणार आहे, अशी आश्वासने देऊन, परिस्थितीने गांजलेल्या या स्त्रियांचे शोषण ही व्यवस्था करते. स्वतः अन्याय, अपमान सोसून कुटुंबाची जबाबदारी सांभाळणारी स्त्री 'बिराड'मधून दिसते. कधी ती बापाचा संसार सांभाळते. कधी नवऱ्याला सांभाळून घेते. इस्माईलचा खून करायला निघालेल्या पवारांना यशोदा समजावून सांगते. "आपुन भिकारी लोक हाव. ह्या गावात आपल्याकडून बोलायला आपलं कोन न्हाईत. गावाचा गाव बळी आन् शेजेगावाच गाढव बळी. असली गत होईल आपली. आपण बोंब केली तर आपल्याच आब्रूचं खोब्रं होईल. आपुन पोलिसकडं गेलू तर पोलिसबी आपल्यालाच बडवतील. इस्माईलच्या घरी कशाला गेलते म्हनतील. तवा आपल्या ईजूची शपथ हाय तुम्हाला. म्या तुम्हाला हात जोडते, त्येला एक डवा सोडून दिऊ."यशोदेने मांडलेल्या या विचारातून तिच्या मनातील भय व्यक्त होताना दिसते. आपल्यावर अन्याय झाला पण त्याला वाचा फोडली तर आपल्यालाच दोषी ठरविण्यात येईल, या यशोदेला असलेल्या वास्तवाच्या जाणिवेतून व्यवस्थेतील भयावहतेची, असुरक्षिततेची कल्पना येते. अन्याय, अत्याचार सहन करायचा आणि प्रतिकार तर दूर पण तोंड सुध्दा उघडायचे नाही असा हा भयग्रस्त समाज आहे. या समाजातील स्त्रीचे माणूस म्हणून जगणेच या व्यवस्थेने हिरावून घेतल्याचे दिसते.

जातपंचायतीचा क्रूर न्याय :

बेलदार समाज सोयरिक जुळविण्यापासून काडीमोड घेण्यापर्यंतचे सर्व विषय जातपंचायतीसमोर मांडले जातात आणि ही पंचायत न्यायनिवाडा करते. जातपंचायतीने दिलेला न्याय अतिशय क्रूर, अमानुष, थरकाप उडविणारा आहे. सरीमामीचा ही जातपंचायत बळी घेते. धोंड्यामामाला जाऊन दीड–दोन वर्षे झालेली आणि सरीमामी मात्र गरोदर तिला आठवा महिना. हा प्रश्न जातपंचायतीसमोर आल्यानंतर तिने दिलेला निकाल भयंकर आहे. सरीमामीचे बाळ पाडण्याचा निकाल दिला जातो आणि जनावरालाही लाजवेल अशा तऱ्हेने पोटावर मारहाण करून बाळ पाडले जाते. या जीवघेण्या प्रकारातून सुटका होते न होते तर लगेच दुसरी शिक्षा तिला दिली जाते. तापवलेल्या लालबुंद उलथण्याने तिला डाग दिले जातात, यासाठी की ती पुन्हा गुन्हा करणार नाही.

ISSN - 2278-9308

या साऱ्या प्रकारात सरीमामीला कोठेही समजून घेतले जात नाही. यातच तिचा मृत्यू होतो. बाळालाही जन्माला येण्याआधीच जीव गमवावा लागतो. म्हातारा खेम्या बायको मेल्यानंतर तरुण रकमीशी लग्न करतो. ती तरुण असल्यामुळे तिच्यावर नेहमी संशय घेतो. रकमीचे परशाशी संबंध आहेत या संशयावरून तिच्याशी काडीमोड घ्यायला निघालेला खेम्या पंचायतीच्या लोकांना आपल्या पैशाच्या जोरावर काडीमोडाचा निकाल द्यायला भाग पाडतो. रकमीचे याआधी सात लग्न झाली आहेत. आठवे लग्न नको, मला काडीमोड नको म्हणून ती गयावया करते. तिचे आईवडील रडतात पण त्यांचे काहीच चालत नाही. खेम्यासारखा म्हातारा सुध्दा त्याला हवे तेव्हा लग्न करतो, त्याच्या इच्छेने काडीमोडही घेतो. यामध्ये भरडली जाते ती स्त्री. तिच्या भावभावनांचा, इच्छेचा विचार जातपंचायत करत नाही. तिच्या इच्छेविरुध्द तिचा परशाशी मोहतर लावला जातो. जातपंचायतीने दिलेले निकाल जसे क्रूर आहेत तसेच ते ज्याच्याजवळ पैसा आहे, ताकद आहे, त्याच्या बाजूचे राहिलेले दिसतात.

रामा बेलदाराची मुलगी जना हिचे लग्न शंकऱ्यासोबत ठरते. अडवणूक करून रामा वरपक्षाकडून पैसे, दागिने उकळतो आणि जनाला घेऊन पसार होतो. नंतर त्याला पकडून आणले जाते. जातपंचायत निकाल देते की, रामा बेलदाराने आपली बायको शंकऱ्याकडे चार वर्षे गहाण ठेवावी किंवा जनाचे लग्न शंकऱ्याशी करावे. दरम्यान रामाने पैसे उकळून दुसऱ्या ठिकाणी जनाचे लग्न लावून दिलेले असते. या समाजात मुलीकडचे हुंडा घेतात. जनाचे शंकरशी लग्न ठरलेले असताना रामा तिच्यासाठी दुसरे स्थळ पाहून तिचे लग्न लावून देतो. आणि पंचायतीकडून दिलेल्या निकालानुसार तिला तिच्या नवऱ्याच्या घरून पळवून आणून शंकऱ्याशी लग्न लावून देतो. स्त्रीच्या भावभावनांचा विचार तिचे घरचेही करताना दिसत नाहीत आणि पंचायतीतील पंच हे दारू पिऊन बेहोष झालेले, शिक्षणाचा गंध नाही, अंधश्रध्दांचा मनावर पगडा असलेले. त्यामुळे अन्याय होतो तो स्त्रीवर. तिला जातपंचायतीने लादलेला निर्णय स्वीकारावा लागतो. स्त्रीला गहाण ठेवण्याचा अमानवी प्रकार या समाजात आहे. या साऱ्या गोष्टी स्त्रीकडे एक वस्तू म्हणून पाहण्याचा दृष्टिकोनच स्पष्ट करतात. बायको दुसऱ्यासोबत पळून गेली आणि त्यासाठी नवऱ्याला शिक्षा झाल्याचे प्रकारही आढळतात. भोयाची बायको जोश्यासोबत पळून जाते तेव्हा जातपंचायत बायको नीट सांभाळता आली नाही म्हणून भोयाला सत्तर हजाराचा दंड करते. हा दंड त्याने पिढ्यान्‌पिढ्या भरायचा.त्याने तो न भरल्यामुळे त्याला जातीबाहेर टाकले जाते. त्यामुळे त्याच्या मुलाबाळांच्या लग्नाचा प्रश्न निर्माण होतो. त्यातूनच भोयाची मुलगी शांतीला रखेलपण स्वीकारावे लागते. रामचंद्रच्या बायकोने एका मुसलमानाच्या छत्रीखाली बसून भजी खाल्ली म्हणून जातपंचायत बसते. असा एक प्रसंग बिराडमध्ये आला आहे. दोन्ही बाजूने आरोप प्रत्यारोप होतात आणि मारामारी होते. जातपंचायतीचे पुढारी आणि पंच दहशत निर्माण करून स्वतःचे महत्व वाढवताना दिसतात. पारधी समाजातही जातपंचायत प्रभावी आहे. बिराडमध्ये आलेला एक प्रसंग असा आहे, बायकोचे एका मुसलमानासोबत संबंध आहेत अशा संशयावरून नवरा पंचायतीसमोर आरोप करतो. तिची पवित्रता पाहण्यासाठी तिला उकळत्या तेलात टाकलेला रुपया, तेलात हात घालून काढावा लागतो. यामध्ये तिचा हात भाजून निघतो पण जातपंचायतीला या क्रूरपणाची, अघोरीपणाची पर्वा नाही. ती पवित्र आहे असा शिक्कामोर्तब करून ते दारू, मटण ६.चा आनंदाने आस्वाद घेतात. सरीमामी, रकमी, जना या बिराडमध्ये आलेल्या प्रातिनिधिक स्त्रिया आहेत. अशा कित्येक स्त्रिया जातपंचायतीच्या मनमानी निर्णयाच्या बळी ठरल्या असतील.

समारोप :

'बिराड' मधील स्त्री ही पुरुषी वर्चस्वाखाली आणि जातपंचायतीच्या प्रभावाखाली गांजून गेलेली आहे. तिच्यावर सतत अन्याय, अत्याचार होत आलेले आहेत. काबाडकष्ट करून संसाराला हातभार लावणारी ही स्त्री आहे. परंतु तिच्या मनाचा, भावभावनांचा विचार तिचे घरचे सुध्दा करताना दिसत नाहीत. यंकातात्याची हरणी विधवा होते आणि तिचे सासुसासरे तिचा मोहतर एका म्हाताऱ्याशी लावून देतात. तिची इच्छा नसताना असे भोग तिच्या वाट्याला येतात. मुलाबाळांना सोडून तिला म्हाताऱ्या नवऱ्यासोबत जावे लागते. तिचा हंबरडा ऐकून कोणीही तिला या परिस्थितीतून सोडवू शकत नाही. पुरुषी समाजव्यवस्थेने, जातपंचायतीने जे काही त्यांच्यासाठी वाढून ठेवले आहे ते या स्त्रियांना स्वीकारावे लागते. स्त्रियांना झालेल्या शिक्षा, त्यांचे मृत्यू हे विचार





Scanned with CamScanner

ISSN - 2278-9308

करायला लावणारे आहेत. स्वतःच्या समाजाकडून होणारे अत्याचार, आणि गावगुंडाकडून, पोलिसांकडून एकंदर उपभोगवादी व्यवस्थेकडून होणाऱ्या शोषणाच्या या स्त्रिया बळी ठरल्या आहेत. स्वतःच्या तंत्रानुसार पुरुष तिचा वापर करून घेतो. सिरंग सालार आपल्या मुलीचा सिंधुचाही असाच वापर करून घेताना दिसतो. आपला बाप फसवणूक करणारा आहे याची सिंधूलाही जाणीव आहे. आईवडीलांच्या विचारात येऊन यशोदा वाहवत जाते. पवारांना आजारी अवस्थेत सोडून निघून जाते पण नंतर तिला आपल्या वागण्याचा पश्चातापही झालेला दिसतो. इच्छा नसताना तिचाही काडीमोड होतो. मेल्यानंतरही यातना संपत नाहीत. स्मशानात पुरलेल्या सोजीला पुन्हा उकरून काढावे लागते. बुढीच्या नशीबात तर मुठमातीही नाही. पारीमामी, सरीमामीला आलेला मृत्यू यातना देऊन जातो. पांडू वाचावा म्हणून ब्राम्हण समाजातल्या अनिताला त्याला सोडून जावे लागते. आंतरजातीय विवाह मान्य न करणारा हा समाज आहे. पांड्या गळफास घेऊन आत्महत्या करतो. डोंबाऱ्याची दोनतीन वर्षांची मुलगी खेळ करून दाखवताना पडून तडफडून मरते. पोटासाठी वणवण भटकत, काबाडकष्ट करत वाट्याला आलेले जीवन निमूटपणे स्वीकारून जगणाऱ्या या स्त्रिया आहेत. भटके आयुष्य, अज्ञान, अंधश्रध्दा, काबाडकष्ट, सर्व बाजूंनी होणारे शोषण यामुळे अत्यंत यातनामय आयुष्य या स्त्रिया जगताना दिसतात. बिराड मधील स्त्री व्यक्तिरेखांमध्ये एक पुतळा शिक्षणाचे महत्व समजून घेते. पवारांनी शिकून आपले आयुष्य बदलावे अशी तिची इच्छा बोलून दाखवून, शिकण्यासाठी ती पवारांना साथ देते. एकंदरीत अत्यंत क्लेशकारक, असुरक्षित, कष्टाचे आयुष्य या स्त्रियांच्या वाट्याला आले आहे. स्वतंत्र भारतात समाजव्यवस्थेकडून या स्त्रियांवर फार अन्याय झालेला आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, भटकेपण, नवऱ्याचे व्यसनीपण, जातपंचायतीचा राक्षस, व्यवस्थेकडून होणारी पिळवणूक, छळवाद यामुळे या स्त्रियांचे आयुष्य भरडून निघाले आहे.

**संदर्भ – टिपा**

1. अशोक पवार, बिराड, चौथी आवृत्ती 2010, पुणे, पृ.क. 8–9
2. तत्रैव, पृ.क. 153

Co - Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana

239 238



Scanned with CamScanner